## विद्यार्थी वसतिगृह, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर,

दि. 14-09-2020

विषय : **विद्यार्थी वसतिगृहातील मुलांचे साहित्य परत देणेबाबत...**

महोदय,

जागतिक महामारी (कोविड-१९) च्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाच्या वतीने विद्यार्थी वसतिगृहामध्ये विलगीकरण केंद्र सुरु करण्यात आले आहे. सदर वसतिगृहातील खोल्यामध्ये मुलांचे साहित्य, महत्वाची शैक्षणिक / संशोधनाची कागदपत्रे असून त्यांना हे साहित्य / कागदपत्रे परत घेण्यासाठी काही विद्यार्थी वेळोवेळी विद्यार्थी वसतिगृह प्रशासनाशी संपर्क करुन मागणी करीत आहेत. त्या अनुषंगाने खालील मुद्दांच्या आधारे मुलांना त्यांचे साहित्य परत देण्यात येत आहे.

1. विद्यार्थ्यांचे साहित्य हे परत करण्याचा कालावधी विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी खालील वेळापत्रकाप्रमाणे असेल. आंतर जिल्हा परवानगी व आरोग्याची काळजी विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तिगत पातळीवरती घेवूनच साहित्य घेण्यासाठी यावे.
   - टिप - काही कारणास्तव आपणास स्वत:चे साहित्य घेण्यास अशक्य असल्यास आपल्या रुमपार्टनर किंवा इतर मित्रास आपल्या ना-हरकत पत्राच्या आधारे साहित्य देण्यात येईल. (नमुना क्र.१)
2. साहित्य परत घेते वेळीस विद्यार्थ्यांकडे वसतिगृहाचे व विद्यापीठाचे ओळखपत्र असणे आवश्यक आहे किंवा साहित्य घेणा-या व्यक्तिचे कोणनेही ओळखपत्र आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांनी मेसबिल, मेस डिपॉझिट, हॉस्टेल राहण्याचे भाडे, इतर देणे रक्कम असल्यास ती भरुन त्याचा पुरावा सादर करावा व साहित्य ताब्यात परत घेण्यात यावे.
3. जे विद्यार्थी आपले साहित्य परत घेऊन जाणार आहेत, त्यांनी साहित्य घेऊन जाताना आपल्या रुम पार्टनर सोबत यावे. अन्यथा त्याचे ना हरकत पत्र (Hard copy or soft copy) (नमुना क्र. २) घेऊन यावे. तसेच आपल्या साहित्याची यादी वसतिगृहास जमा करण्यात यावी.
4. साहित्य घेण्यात येतेवेळी विद्यार्थ्यांनी स्वत:ची व्यक्तिगत आरोग्याची काळजी (मास्क, सॅनिटायझर, शूज, फुलशर्ट, पॅन्ट इ.) बाबत शासनाचे वेळोवेळी पारीत झालेल्या आदेशांचे पालन करणे बंधनकारक आहे.
5. ज्या विद्यार्थ्यांना साहित्य घेण्यास अडचण येत असेल, त्यांच्यासाठी साहित्य देण्याची व्यवस्था नंतर करण्यात येईल.

वरील सर्व सूचनेचे पालन करुन विद्यार्थ्याने खालील वेळापत्रकाप्रमाणे त्याचे साहित्य रितसर परत नेणेचे आहे. आतापर्यंत आपण केलेल्या सहकार्याबद्दल विद्यापीठ प्रशासन आपले आभार व्यक्त करत आहे.

**मुलांचे वसतिगृह क्र. 1, 2, 3 व टीव्ही हॉल**

| दिनांक | वेळ | मजला | खोली क्र. |
|---|---|---|---|
| बुधवार | 11 ते 2 | 1 | 1 ते 14 |
| 16-09-2020 | 2 ते 5 | 1 | 15 ते 28 |
| गुरुवार | 11 ते 2 | 2 | 29 ते 42 |
| 17-09-2020 | 2 ते 5 | 2 | 42 ते 56 |
| शुक्रवार | 11 ते 2 | 3 | 57 ते 70 |
| 18-09-2020 | 2 ते 5 | 3 | 71 ते 84 |
| शनिवार | 11 ते 2 | 4 | 84 ते 98 |
| 19-09-2020 | 2 ते 5 | 4 किंवा T.V. hall | 99 ते 105 (+T.V Hall) |

1) वरिल नियोजन हे विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने विद्यार्थी एकत्र येऊ नयेत या अनुषंगाने केले असून त्यास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद अपेक्षीत आहे.

Sd/-
11/9/2020

Sd/-
चिफ रेक्टर
मुलांचे वसतिगृह